# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.11.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

1. एक वसुंधरा, एक कुटुंब, एक भविष्य ही संकल्पना अद्यापही समर्पक – पंतप्रधानांचं जी-20 देशांच्या शिखर परिषदेत प्रतिपादन
2. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणूकीसाठी उद्या मतदान; निवडणूक यंत्रणा सज्ज
3. मणिपूरमध्ये CAPF च्या 50 अतिरिक्त तुकड्या तैनात करणार
4. दिल्लीतील प्रदुषणाच्या पार्श्वभुमीवर शेजारील राज्यांनी प्रदुषण नियंत्रणासंदर्भात निर्बंध लागू करावेत – सर्वोच्च न्यायालय

आणि

5. आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला संघाचा उपांत्य सामना आज जपानबरोबर

**जी-20**

नवी दिल्लीत गेल्या वर्षी झालेल्या जी-20 शिखर परिषदेची एक वसुंधरा, एक कुटुंब, एक भविष्य ही संकल्पना अद्यापही समर्पक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ब्राझिलच्या रीओ दी जेनेरो शहरांत सुरु असलेल्या जी-20 देशांच्या शिखरपरिषदेत ते काल बोलत होते. सामाजिक समरसता तसंच भूक आणि गरिबी निर्मुलन याविषयावर आयोजित चर्चासत्रांत ते बोलत होते. भारताच्या अधयक्षपदाच्या कार्यकाळांत सुरु झालेली मानवकेंद्रित निर्णयांची परंपरा ब्राझिलच्या अध्यक्षतेखालील कार्यप्रणालीतही सुरु असल्याचं ते म्हणाले. जी-20 गटानं महिला नेतृत्व आणि युवकांना केंद्रस्थानी ठेऊन सर्वसमावेशक विकासाला प्राथमिकता दिल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं. जागतिक स्तरावरील अनिश्चिततेचा परिणाम दक्षिणेकडील देशांत अन्न, इंधन आणि खतं या क्षेत्रावर होत असून या मुद्यांना प्राथमिकता दिल्याखेरीज शिखर बैठकीतील चर्चा य़शस्वी होणार नाहीत याकडे पंतप्रधानांनी जागतिक नेत्यांचं लक्ष वेधलं. गरिबी विरुद्ध जागतिक आघाडी सुरू केल्याबद्दल ब्राझीलच्या G20 अध्यक्षांच्या पुढाकाराचं समाज माध्यमावरील संदेशांत मोदींनी कौतुक केलं आहे. या प्रयत्नांना भारताच्या पूर्ण पाठिंब्याची ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी

यांनी ब्रिटन, इटली, फ्रांस, नॉर्वे, पोर्तुगल आणि इंडोनेशियाच्या प्रमुख नेत्यांची भेट घेतली. या देशांदरम्यान द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.  मोदी यांची त्यांचे ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांच्याशीही चर्चा झाली. येत्या काही वर्षात भारत आणि ब्रिटन हरित ऊर्जा, संरक्षण आणि नवीन तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात एकत्रित काम करण्यास उत्सुक आहेत. दोन्ही देश व्यापार तसंच सांस्कृतिक संबंध वृध्दींगत करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं मोदींनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**मतदान व्यवस्था**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठीची  सर्व तयारी पूर्ण झाली आहे. राज्यात उद्या एकाच टप्प्यात सर्व 288 विधानसभा मतदारसंघांमध्ये तसंच नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात एकंदर 4136 उमेदवार रिंगणात असून त्यातले 2 हजार 86 उमेदवार अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. महायुतीतर्फे भाजपा 149, शिवसेना 81 आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 59 जागांवर निवडणूक लढवत आहेत. महाविकास आघाडीकडून काँग्रेस 101, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 95 आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं 86 मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले आहेत.बहुजन समाज पक्ष 237 आणि एआयएमआयएम 17 जागांसाठी निवडणूक लढवत आहेत. झारखंडमध्ये विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी राज्यातील 12 जिल्ह्यातील 38 मतदारसंघात उद्या मतदान होणार आहे. या सर्व मतदानकेद्रांवरील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडावी यासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे. तसंच  केरळमधील पल्लकड या एका जागेसाठी तर उत्तर प्रदेशातील 9 विधानसभा जागांसाठीच्या पोटनिवडणूकीचा प्रचारही काल थंडावला. येत्या शनिवारी 23 तारखेला या सर्व निवडणुकीची मतमोजणी होणार आहे.

**अमित-शहा**

गांधीनगर इथं राष्ट्रीय रक्षा विद्यापिठांत अखिल भारतीय पोलीस सायन्स काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाचं उद्घाटन केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज होणार आहे. मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यावेळी उपस्थित असतील अमित शहा 2 दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून ते इतर काही कार्यक्रमांमध्येही सहभागी होतील.

**सीतारामन**

बँकांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रासाठी आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 6 लाख 12 हजार कोटी तर 2026-27 मध्ये 7 लाख कोटी रुपये पतपुरवठा करण्याचं उद्दीष्ट ठेवावं असं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल मुंबईत 11 व्या एसबीआय बँकिंग अँड इकॉनॉमिक्स

परिषदेत बोलत होत्या. विकसित भारताचं स्वप्न सत्यात आणण्याची आकांक्षा ही या परिषदेची संकल्पना आहे. 2021-22 मध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेनं 5 व्या क्रमांकावर झेप घेतली असं सांगून येत्या काही वर्षात ती तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**शक्तीकांत-दास**

बँकींग क्षेत्रातील अनैतिक प्रक्रियांना आळा घालण्यासाठी अंतर्गत प्रशासकीय साचा  मजबूत करावा असं आवाहन भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी काल केलं. खासगी क्षेत्रातील बँकांच्या संचालकांची मुंबईत बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होते.

**के-संजय-मुर्ती**

भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक म्हणून के संजय मुर्ती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या शिक्षण मंत्रालयात उच्च शिक्षण विभागाचे सचिव म्हणून ते कार्यरत आहेत. ऑगस्ट 2020 पासून या पदावर असलेल्या गिरीश चंद्र मुर्मू यांची ते जागा घेतील.

**निवडणूक हिंसाचार**

महाराष्ट्रात काल निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी हिंसाचाराच्या दोन घटना घडल्या. नागपूर जिल्ह्यात काटोळ इथं माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक झाली. यामध्ये देशमुख यांना किरकोळ इजा झाली असून त्यांच्यावर नागपूरमधल्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. पक्षाचे वरीष्ठ नेते शरद पवार यांनी या घटनेचा निषेध केला आहे. देशमुख यांची प्रकृती स्थिर असून पोलिस या घटनेचा तपास करत आहेत अशी माहिती नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. जळगांवमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारावर हल्ला झाल्याचं वृत्त आहे. या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

**मणिपूर**

मणिपूरमधील सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी काल विविध स्तरावरील अधिकाऱ्यांबरोबर उच्च स्तरीय  आढावा बैठक घेतली. केंद्रिय सशस्त्र पोलीस दल अर्थात CAPF च्या 50 अतिरिक्त तुकड्या मणिपूरमध्ये तैनात करण्यात येणार असल्याची माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिली. राज्यात शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी आवश्यक ती पावलं उचलावीत अशा सुचना शहा यांनी दिल्या.

**दिल्ली प्रदूषण**

राजधानी दिल्ली क्षेत्रातली हवेची गुणवत्ता आणखी घसरली असून आज सकाळी हवेचा गुणवत्ता निर्देशांक 494 अंकांवर गेला होता. केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार काही भागात हा निर्देशांक 500 नोंदवला गेला. यामुळे रेल्वे आणि हवाई वाहतूक सेवा विस्कळीत झाली आहे. दरम्यान दिल्लीतल्या वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सर्व सरकारी कार्यालयांमध्ये कामकाजाची वेळ वेगवेगळी ठेवण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी असे आदेश नायब राज्यपाल विनाई कुमार सक्सेना यांनी दिल्ली राज्य सरकारला दिले आहेत. दिल्ली राज्य सरकार आणि दिल्ली महापालिकेच्या सर्व कार्यालयांना हा आदेश लागू असेल. महापालिकेच्या कार्यालयाची वेळ सकाळी साडेआठ ते संध्याकाळी पाच तर राज्य सरकारी कार्यालयांची वेळ सकाळी 10 ते संध्याकाळी साडेसहा अशी असेल. पुढच्या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत ही व्यवस्था सुरू राहणार आहे.दिल्लीमधे दहावी आणि बारावीसह सर्व शालेय वर्ग आजपासून ऑनलाइन घेण्यात येतील असं मुख्यमंत्री अतीशी यांनी काल जाहीर केलं. महाविद्यालयांचे वर्गही शनिवारपर्यंत ऑनलाइन पद्धतीनं होणार आहेत.आणखी दोन दिवस दिल्ली शहर आणि राजधानी क्षेत्रात रात्री आणि सकाळच्या वेळेत धुरकं तसंच दाट धुकं असेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.दरम्यान, राजधानी क्षेत्रातली प्रदूषणाची वाढती पातळी लक्षात घेता दिल्ली आणि दिल्लीच्या सीमेवरील राज्यांनी वर्गीकृत प्रतिसाद कृती आराखड्याच्या चौथ्या टप्प्यासाठीचे निर्बंध लागू करावेत अशी सूचना सर्वोच्च न्यायालयानं केली आहे.

**चीन**

चीन खुल्या मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून शेनझेन इथं सुरुवात होणार आहे. भारताच्या बी. सुमीथ रेड्डी आणि एन. सिक्की रेड्डी यांची मिश्र दुहेरीच्या Round of 32 मध्ये अमेरिकेच्या प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई यांच्याशी लढत होईल. भारताचे सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पुरुष दुहेरी स्पर्धेच्या पहिल्या फेरीत चायनीज तैपेईच्या जोडीशी सामना होईल. पुरुष एकेरी, लक्ष्य सेनचा सामना सातव्या मानांकित मलेशियाच्या ली झी जियाशी होणार आहे. महिला एकेरीच्या लढतीत, पीव्ही सिंधूची थायलंडच्या सुपानिडा कातेथोंगशी लढत होईल.

**आशियाई - महिला**

बिहारमधील राजगीर इथं सुरु असलेल्या आशियाई महिला हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत साखळीतील अखेरच्या सामन्यात भारतीय संघानं जपानवर 3-0 अशी मात केली. या स्पर्धेतील उपांत्य फारीचा सामना आज याच जपान संघाबरोबर खेळला जाणार आहे. दिपिकानं या स्पर्धेत सर्वाधिक गोल केले असून कालच्या सामन्यातही तीनं 2 गोल नोंदवले तर उपकर्णधार नवनीत कौरने 37 व्या मिनिटाला

गोल केला. अनेक खेळांमध्ये पाच विजयांसह, भारतीय संघ सर्वाधिक 15 गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे, तो ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या चीनपेक्षा 12 गुणांसह पुढे आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**